सत्यमेव जयते
महाराष्ट्रशासन
महसुलववनविभाग
**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, निफाड यांचे कार्यालय**
दुरुध्वनीक्र. ०२५५०-२४१०२४ EMAIL ID- tahasilniphad@gmail.com

क्र./कुका/कावि/ १०५५ /२०२३ दि. २० /१२/२०२३

# प्रसिध्दी पत्रक

**विषय :-** कोतवाल पदभरती- २०२३ मध्ये लेखी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणीकामी उपस्थित राहणे बाबत....

**संदर्भ :-१.** मा. उपजिल्हाधिकारी (प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांचेकडील पत्र क्र.कक्ष.४/कुका.४/कावि/१२९१/२०२३ दि. १९.१२.२०२३

**२.** मा. उपविभागीय अधिकारी निफाड यांचेकडील पत्र क्र.कु.का./कावि/८०४ /२०२३ दि. १५.१२.२०२३

नाशिक जिल्ह्यातील निफाड उपविभागातील निफाड तालुक्यातील कोतवाल पदाची रिक्त असलेली पदे भरती करणेकामी प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही चालू झालेली आहे. त्यानुसार कोतवाल पदभरती बाबत लेखी परीक्षा दि. १०/१२/२०२३ रोजी घेण्यात आली असून कोतवाल पदासाठी घेतलेल्या लेखी परिक्षेचा निकाल https://nashik.ppbharti.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

सदर, कोतवाल भरती प्रक्रियेअंती **दिनांक. २६/१२/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता** कागदपत्रे पडताळणीकामी **तहसिल कार्यालय, निफाड** येथे सोबत जोडलेल्या कोतवाल पदभरती- २०२३ प्रपत्र- अ मध्ये नमूद गावातील उमेदवारांनी त्यांचे नावासमोर नमुद तारखेला, ऑनलाईन भरलेल्या अर्ज, शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे (दोन झेरॉक्स संचासहित स्व-साक्षांकित केलेले) घेवून उपस्थित रहावे. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

**अनिवार्य असणारी प्रमाणपत्रे.-**

१. उमेदवारांनी खाली नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेसंबंधी प्रमाणपत्रामधील त्यांना लागू असलेले प्रमाणपत्रे उपलब्ध करुन द्यावीत. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शालांत परीक्षा इयत्ता ४ थी (४ थी मार्कशिट) इतर समकक्ष बोर्डाचे प्रमाणपत्र किवा शाळा सोडल्याचा दाखला

२. उमेदवार शारीरिक दृष्या सक्षम असल्याबाबतचे वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालयांचे अथवा वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र,

३. स्थानिक कायम रहिवासी असलेबाबत संबंधित गावाचे ग्रामसेवक/तलाठी यांचा दाखला / आधार कार्ड / निवडणूक कार्ड / रेशन कार्ड / स्वयंघोषणापत्र (ग्रामसेवक यांनी रहिवास दाखला दिला असल्यास मंडळ अधिकारी व विस्तार अधिकारी ग्रामपंचायत समिती यांचा अहवाल सोबत असने आवश्यक आहे.)

४. उमेदवाराचे चारित्र्य निष्कलंक असल्या बाबतचे संबंधित पोलीस स्टेशनकडील चारित्र्य प्रमाणपत्र.

५. उमेदवार कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध ठेवणार नसलेबाबतचे रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर केलेले प्रतिज्ञापत्र,

६. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ मधील लहान कुटुंबाचे घोषणापत्र,

७. मागास प्रवर्गासाठी आरक्षित पदाकरिता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र.

८. मागास प्रवर्गातील उमेदवार (वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज. (क), भ.ज.(ड) वि.मा.प्र. व इ.मा.व. यांनी वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेअर) या मध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन-क्रिमिलेअर) प्रमाणपत्र,

९. महिला उमेदवारांसाठी वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन-क्रिमिलेअर) प्रमाणपत्र

वरील कागदपत्र पडताळणीकामी कोतवाल पदभरती- २०२३ प्रपत्र अ मध्ये नमुद तारखेस अर्जदार यांनी उपस्थितरहावे.

(शरद घोरपडे)
**सचिव**
**कोतवाल भरती प्रक्रिया-२०२३**
**तथा तहसिलदार, निफाड**

**प्रत**

१. मा. जिल्हाधिकारी नाशिक (कुळकायदा शाखा) यांचेकडेस माहितीसाठी सविनय सादर.

२. संबंधित तलाठी / ग्रामसेवक ता. निफाड जि. नाशिक

२/- आपले अधिनस्त कोतवाल पदभरती २०२३ प्रपत्र - अ चावडी व ग्रामपंचायत कार्यालयाचे नोटीस बोर्ड वर प्रसिध्द करुन उलटटपाली अहवाल सादर करण्यात यावे. सदर बाबीस विलंब टाळावा.

३. म. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामी सादर.

४. श्री. सुनिल देशमुख, श्री गजानन झेरॉक्स ॲण्ड प्रिंटर्स, भंडारा यांना संकेस्थळावर प्रसिध्द करणे कामी रवाना.